THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 9TH JULY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### भाग २ रा.

### लोकांच्या व रेलवेवरील कामगारांच्या समजुतीसाठीं कानू.

सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद् आक्ट याच्या ४७ व्या कलमाच्या (१) ल्या व (२) ऱ्या पोट-कलमांवरून, आणि पब्लिक वर्क्स डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर २६७, तारीख ११ माहे जून सन १८९०, यावरून दिलेले अधिकार चालवून, डैरेक्टर जनरल आफ् रेलवेज यांनीं, ब्रिटिश हिंदुस्थानांतील रेलवेच्या ज्या लैनी सरकाराकडून चालविण्यांत येत असतील व ज्यांचा उतारू, जनावरें किंवा माल जाहीर रीतीनें नेण्यासाठीं विवक्षित कालीं उपयोग करण्यांत येत असेल, त्या लैनींचा उपयोग करणाऱ्या लोकांच्या, व त्या लैनींवर ठेवलेल्या रेलवेच्या कामगारांच्या, समजुतीसाठीं यावरून खालीं दिलेल्या साधारण कानू केल्या आहेत.

अनुक्रमणिका.

बाब १ ली.

प्रारंभींचे नियम.

कानू.

१. व्याख्या.

बाब २ री.

उतारू नेणें.

२. उतारूंचीं तिकिटें.

३. पावतींत किंवा तिकिटांत भाडें दाखल करण्यांत चूक झाली असल्यास.

४. कनिष्ठ प्रतीची गाडी सोडून वरिष्ठ प्रतीच्या गाडीनें प्रवास करूं इच्छिणाऱ्या उतारूबाबद.

कानू.

५. स्त्री उतारू.

६. कैदी व वेड लागलेले उतारू.

सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेले उतारू.

७. "सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य मानलेले रोग."

८. सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या उतारूंस कोणत्या अटींवर न्यावें त्या अटी.

गाड्यांतील रोगबीजाचा नाश करणें.

९. गाड्यांतील रोगबीजाचा नाश करणें.

लगेज.

१०. लगेज नोंदलें पाहिजे.

११. उतारूंचें लगेज मोफत वेण्याबद्दल.

१२. उतारूबरोबर गाडींत असावयाचें लगेज.

१३. पुर्तेपणीं सुरक्षित न केलेलें लगेज.

कानू.

## बाब ३ री.

### भयकारक अगर त्रासदायक माल नेणें.

१४. " भयकारक माल " ह्मणून ठरविलेले पदार्थ.

१५. " त्रासदायक माल" ह्मणून ठरविलेले पदार्थ.

१६. भयकारक माल नेण्यासाठीं घेणें.

१७ भयकारक मालासाठीं स्पेशल व्हानी.

१८. भयकारक अगर त्रासदायक मालाचें भाडें अगाऊ देणें.

१९. भयकारक अगर त्रासदायक माल भरणें व उतरणें.

२० साधारण व्यापारी माल बारी पदार्थांबरोबर भरूं नये.

२१. ज्यांत बारी पदार्थ आहेत अशा वाहनावर चिठ्ठी असणें.

२२. असंरक्षित दिवे व पेटलेले फाणस.

२३. बारी पदार्थांनीं भरलेलीं वाहनें कोणत्या ट्रेनीनें पाठवावयाचीं तें.

२४. ब निशाणी केलेला भयकारक माल पासेंजर ट्रेनींतून पाठविणें.

२५. दावा न सांगितलेला भयकारक माल.

२६. बारी पदार्थांविषयीं आक्ट व पिट्रोलियम आक्ट ह्यांअन्वयें केलेल्या कानू कायम आहेत.

कानू.

## बाब ४ थी.

### उतारूंनीं व इतर मनुष्यांनीं केलेले अपराध, व शिक्षा.

२७. दारू पिऊन झिंगल्याच्या बाबतींत अगर पीडा केल्याच्या बाबतींत स्टेशन मास्तराचीं कर्तव्यें.

२८. रेलवेच्या जागेवर तंबाखू वगैरे ओढणें, अगर उघडा दिवा किंवा विस्तव जवळ बाळगणें, अगर गार्डींत उघडा दिवा किंवा पेटता फाणस ठेवणें.

२९ रेलवेच्या जागेंत मनुष्यांस येऊं न देणें.

३० उतारूनें अपराध केला असतां स्टेशन मास्तरानें तपास करणें.

३१. गार्डांनीं कानू मोडूं देऊं नयेत.

३२. धरणें.

३३. रेलवेच्या नोकरांनीं कानू मोडल्याबद्दल शिक्षा.

पुरवणी अ.—(सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट ह्याअन्वयें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कानू ज्या बारी पदार्थांस लागू असतील ते बारी पदार्थ खेरीज करून इतर ) भयकारक माल प्याक करण्याबाबद.

पुरवणी ब.—(सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट याअन्वयें हल्लीं अमलांत असलेल्या रेलवेंच्या संबंधाच्या कानू.

## भाग २ रा.

## बाब १ ली.

### प्रारंभींचे नियम.

व्याख्या. १. या कानूंमध्यें, विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर,—

(१) "पासेंजर ट्रेन" ह्मणजे, सर्वस्वी किंवा मुख्यत्वेंकरून उतारू व इतर *कोचिंग ट्राफिक नेण्यासाठीं योजलेली ट्रेन ;

(२) "गुड्स ट्रेन" ह्मणजे, सर्वस्वी किंवा मुख्यत्वेंकरून हरप्रकारचा व्यापाराचा माल, खनिज पदार्थ, मालमसाला किंवा जिवंत जनावरें नेण्यासाठीं योजलेली ट्रेन;

(३) "गार्ड" या शब्दांत विवक्षित काळीं गार्डाचीं कामें करणारा ब्रेक्समन व दुसरा कोणताही रेलवेचा नोकर यांचा समावेश होतो ;

(४) "स्टेशन मास्तर" ह्मणजे, स्टेशनच्या हद्दींच्या आंत व्यापाराचें काम चालविण्याबद्दल विवक्षितकाळीं जबाबदार असा जो कोणी मनुष्य कामावर असेल तो मनुष्य; आणि या संज्ञेमध्यें—

*उतारू व त्यांबरोबर जाणारें त्यांचें सामान, घोडे, गाड्या, कुत्रे, वगैरे.

(अ) असिस्टंट स्टेशन मास्तर,

(ब) स्टेशन स्वाधीन असणारा क्लार्क, आणि

(क) स्टेशन ज्या मनुष्याच्या स्वाधीन केलें असेल असा कोणताहि दुसरा मनुष्य,

यांचा समावेश होतो.

(५) "अधिकार मिळालेला अमलदार" ह्मणजे, प्रत्येक बाबतींत सांगितलेल्या प्रकारचे हुकुम देण्यास किंवा तशी दुसरी कोणतीहि गोष्ट करण्यास ज्या मनुष्यास योग्य रीतीनें अधिकार मिळालेला असेल तो मनुष्य;

(६) "विशेष हुकुम" ह्मणजे, अधिकार मिळालेल्या अमलदारानें विशेष बाबतींच्या किंवा विशेष प्रसंगांच्या संबंधानें वेळोवेळीं दिलेले हुकुम;

(७) "लिहिणें" या शब्दांत, व या शब्दाचीं व्याकरणसंबंधी रूपें व तज्जातीय संज्ञा यांत "ठशांवर छापणें" आणि "शिळाछापावर छापणें" यांचा, व त्यांचीं व्याकरणसंबंधी रूपें व तज्जातीय संज्ञा यांचा समावेश होतो;

(८) सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेबाबद आक्ट यांत व्याख्या केलेल्या शब्दांचे त्या आक्टांत जे अर्थ दिले आहेत तेच त्या शब्दांचे अर्थ आहेत;

(९) पुल्लिंगी शब्दांत स्त्रियांचा समावेश होतो; आणि

(१०) एकवचनी शब्दांत अनेकवचनाचा व अनेकवचनी शब्दांत एकवचनाचा समावेश होतो.

---

## बाब २ री.

### उतारू नेणें.

उतारूंचीं तिकिटें.

२. (१) उतारूंस दिलेलीं तिकिटें, तीं ज्या रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यानें दिलीं असतील, त्या मुख्याधिकाऱ्यानें निर्दिष्ट केलेल्या तारखेपासून व मुदतीपर्यंत मात्र चालतील.

(२) जर कोणत्याही गार्डास, अगर अधिकार मिळालेल्या अमलदारानें ह्या रकमेअन्वयें काम करण्याचा अख्त्यार दिलेल्या इतर कोणत्याहि रेलवेच्या नोकरास असें वाटण्यास कारण असेल कीं, कोणताहि उतारू तिकिटाशिवाय किंवा वाजवी नाहीं अशा वर्गाच्या गाडींत प्रवास करीत आहे, तर त्यानें त्या उतारूला आपलें तिकिट दाखविण्यास सांगितलें पाहिजे, आणि जो कोणताही गैरवाजवी प्रकार त्याच्या दृष्टोत्पत्तीस येईल त्याबद्दल त्यानें स्टेशन मास्तरास रिपोर्ट केला पाहिजे.

पावतींत किंवा तिकिटांत भाडें दाखल करण्यांत चूक झाली असल्यास.

३. उतारूस दिलेल्या पावतींत किंवा तिकिटांत कोणतेंही भाडें दाखल करण्यांत चूक झाल्यास, रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यास ती चूक दुरुस्त करण्याचा अधिकार आहे.

कनिष्ठ प्रतीची गाडी सोडून वरिष्ठ प्रतीच्या गाडींत प्रवास करूं इच्छिणाऱ्या उतारूबाबद.

४. जर कोणताही उतारू, भाड्यांमधील फरक देऊन, कनिष्ठ प्रतीची गाडी सोडून वरिष्ठ प्रतीच्या गाडींतून प्रवास करण्यास इच्छील, तर ट्रेन स्वाधीन असणाऱ्या गार्डानें किंवा अधिकार मिळालेला अमलदार ह्या संबंधानें रेलवेच्या ज्या कोणत्याही इतर नोकरास नेमील त्या नोकरानें, त्या उतारूस त्याप्रमाणें गाडी बदलूं देण्यासाठीं जरूर असेल ती तजवीज केली पाहिजे.

स्त्री उतारू.

५. जेव्हां स्त्रिया एकट्याच प्रवास करीत असतील, तेव्हां गार्डांनीं त्यांच्या सुखसोयीकडे सर्व प्रकारें लक्ष दिलें पाहिजे, आणि त्या स्त्रियांना ट्रेनींत बसवितांना त्यांनीं त्याप्रमाणें विनंति केल्यास, ज्या गाडींतून इतर स्त्रिया प्रवास करीत असतील तशी ( त्या स्त्रियांच्या तिकिटांच्या वर्गाप्रमाणें ) गाडी पाहून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

कैदी व वेड लागलेले उतारू.

६. कैदी व वेड लागलेलीं मनुष्यें ह्यांस इतर उतारूंशीं मिसळूं देतां नये, परंतु त्यांस, जागा राखून ठेविली असल्यास, त्यांच्या रखवालदारांसह किंवा बरोबरच्या माणसांसह, प्रसंगाप्रमाणें कैद्यांच्या गार्डीत किंवा स्वतंत्र खणांत बसविलें पाहिजे.

### सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेले उतारू.

"सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य" मानलेले रोग.

७. सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद आक्ट ह्याच्या कारणांसाठीं, खालील रोगांस सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य रोग समजलें पाहिजे, ह्मणजेः—

काळरा (पटकी),

डिफ्थेरिया,

लेप्रसी (रक्तपिती),

मीसल्स (गोंवर),

स्कार्लेट फीव्हर,

स्माल पाक्स (देवी),

टायफस फीव्हर (काळज्वर),

टायफॉइड फीव्हर (सन्निपातज्वर), आणि

व्हूपिंग कॉफ (डांग्या खोंकला).

सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या उतारूस कोणत्या अटींवर न्यावें त्या अटी.

८. सांसर्गिक किंवा स्पर्शजन्य रोग झालेल्या कोणत्याही उतारूस, खालीं लिहिल्याप्रमाणें तजविजी करण्यांत आल्याशिवाय, कोणत्याही ट्रेनींतून नेतां नये, ह्मणजे—

(अ) त्यानें आपल्यासाठीं व आपल्याबरोबरच्या माणसांसाठीं एक खण राखून ठेवविला आहे, आणि

(ब) सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद आक्ट ह्याच्या ७१* व्या कलमाअन्वयें, तो उतारू व त्याच्या बरोबरचीं माणसें ह्यांस, तीं रेलवेवर असतील त्या सगळ्या वेळापर्यंत, त्या रेलवेवर असलेल्या अगर त्या रेलवेवर प्रवास करणाऱ्या इतर मनुष्यांपासून वेगळें ठेवण्यासाठीं, सर्व जरूर लागेल ती व्यवस्था केलेली आहे, आणि

(क) त्या रेलवेवर असलेल्या अगर त्या रेलवेवर प्रवास करणाऱ्या इतर मनुष्यांला त्या उतारूचा रोग संसर्गानें किंवा स्पर्शानें लागू नये यासाठीं, जो कोणताहि दुसरा विशेष बंदोबस्त करणें सदरहू कलमांत उल्लेख केलेली परवानगी देणाऱ्या रेलवेच्या नोकरास जरूर वाटेल, तो बंदोबस्त केलेला आहे.

---

* "७१. (१) कलम ४७, पोट-कलम (१), रकम (ड), यांत नमूद केलेल्या अटी पुऱ्या केल्या जातील ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं कोणताही सांसर्गिक अगर स्पर्शजन्य रोग झालेल्या मनुष्यास नेण्यास इनूकार करण्याचा कोणत्याहि रेलवे आडूमिनिस्ट्रेशनास अखत्यार आहे.

सांसर्गिक अगर स्पर्शजन्य रोग झालेल्या मनुष्यांस नेण्यास इनूकार करण्याचा अधिकार.

(२) अशा रोग झालेल्या कोणत्याहि मनुष्यानें, ज्या ठिकाणीं तो रेलवेवर जाईल त्या ठिकाणच्या स्टेशन मास्तराची अगर तें ठिकाण स्वाधीन असलेल्या इतर रेलवेच्या नोकराची मुद्दाम परवानगी घेतल्याशिवाय त्या रेलवेवर जातां कामास नये अगर त्या रेलवेनें प्रवास करितां कामास नये.

(३) पोटकलम (२) यांत सांगितलेली परवानगी देणाऱ्या रेलवेच्या नोकरानें, तसा रोग झालेल्या मनुष्यास त्या रेलवेवर असलेल्या अगर त्या रेलवेनें प्रवास करणाऱ्या इतर मनुष्यांपासून वेगळा ठेवण्याची तजवीज केली पाहिजे."

### गाड्यांतील रोगबीजाचा नाश करणें.

९. कोणत्याही गाडींत सांसर्गिक अगर स्पर्शजन्य रोग झालेला एकादा मनुष्य शिरला ह्मणजे, ती गाडी आपल्या नेमलेल्या ठिकाणीं येऊन पोंचतांच, विशेष हुकुमांअन्वयें, तिच्यांतील रोगबीजाचा नाश केला पाहिजे; आणि रोगबीजाचा नाश करण्याचें काम पुरें होई तोंपर्यंत तींत कोणत्याहि उतारूस शिरूं देतां नये. गाड्यांतील रोगबीजाचा नाश करणें.

### लगेज.

१०. प्रत्येक उतारूचें लगेज नोंदलें पाहिजेः लगेज नोंदलें पाहिजे.

मात्र, जें कोणतेंहि लगेज कानू १२, रकम (१), ह्याअन्वयें कोणताही उतारू गाडींत नेईल तें लगेज नोंदण्याची गरज नाहीं असें फर्माविण्याचा कोणत्याहि रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यास अख्त्यार आहे.

११. रेलवेचा मुख्याधिकारी वेळोवेळीं वजनाची मर्यादा ठरवील त्या मर्यादेच्या आंतील प्रत्येक उतारूच्या लगेजापैकीं कांहीं विवक्षित वजनाचें लगेज मोफत नेऊं दिलें जाईल; मात्र, त्या उतारूनें आपल्या प्रवासाच्या सुरुवातीच्या आधीं आपलें लगेज वजन करण्यासाठीं हजर केलें पाहिजे. उतारूंचें लगेज मोफत घेण्याबद्दल.

१२. (१) स्वतःच्या लगेजापैकीं जे लहानसान डाग प्रवासांत त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठीं जरूर असतील, आणि जे इतर उतारूंची गैरसोय न होतां अगर गाडींतली माणसें बसण्याची जागा कमी न होतां गाडींत ठेवितां येतील, तेच फक्त डाग उतारूनें गाडींत घेतले असतां चालतील. उतारूबरोबर गाडींत असावयाचें लगेज.

(२) जें कोणतेंही लगेज उतारूनें, अगर त्याच्या सांगण्यावरून, गाडींत घेतलें असेल, तें गमावल्याबद्दल, त्याचा नाश झाल्याबद्दल अगर तें खराब झाल्याबद्दल रेलवेचा मुख्याधिकारी जबाबदार होणार नाहीं.

१३. (१) कोणत्याही उतारूचें जें कोणतेंही लगेज योग्य रीतीनें प्याक केलेलें नसेल, अगर योग्य रीतीनें कुलुप लावून बंद केलेलें नसेल अगर इतर प्रकारें पूर्तेपणीं सुरक्षित केलेलें नसेल, तें, कानू १२, रकम (१), हीस अनुसरून त्या उतारूनें [आपल्या बरोबर] गाडींत न घेतल्यास, विशेष करार करण्यांत आल्याशिवाय तें नेण्यास नाकारण्याचा रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यास अख्त्यार आहे. पूर्तेपणीं सुरक्षित न केलेलें लगेज.

(२) उतारूचें कोणतेंही लगेज योग्य रीतीनें प्याक केलेलें नसल्याकारणानें अगर योग्य रीतीनें कुलुप लावून बंद केलेलें नसल्याकारणानें, अगर इतर प्रकारें पूर्तेपणीं सुरक्षित केलेलें नसल्याकारणानें कोणत्याहि प्रकारें तें गमावल्यास, त्याचा नाश झाल्यास अगर तें खराब झाल्यास त्याबद्दल, विशेष करार केलेला असल्याशिवाय, रेलवेचा मुख्याधिकारी जबाबदार होणार नाहीं असें समजावें.

---

# भाग ३ री.

## भयकारक अगर त्रासदायक माल नेणें.

"भयकारक माल" म्हणून ठरविलेले पदार्थ.

१४. सन १८९० चा हिंदुस्थानचा रेल्वेंबाबद आक्ट ह्याच्या कारणांसाठीं खालील पदार्थ भयकारक माल होत असें यावरून ठरविलें आहे, ते पदार्थ येणेंप्रमाणें:—

आसिड कार्बोलीक ... ... ... थ
" " कान्सेन्ट्रेटेड ... ब
" क्रेसिलिक ... ... ... थ
" क्रूड कोल टार, रोगबीजनाशक पदार्थ म्हणून उपयोग करितात तें ... थ
" हैड्रो फ्लुआरिक, दुसरें नांव फ्लुआरिक आसिड. ब
" ग्लेसिअल आसेटिक ... ... ब
" हैड्रोक्लोरिक, दुसरें नांव म्युरिआटिक आसिड किंवा स्पिरिट्स आफ् साल्ट्स ... ... ... य
" नैट्रिक, दुसरें नांव आक्वाफार्टिस ... ब
" सल्फ्यूरिक, दुसरें नांव आइल आफ् व्हीट्रिअल, किंवा व्हिट्रिअल ... ब
" पिक्रिक ... ... ... क
आल्कोहाल, आब्सोल्यूट ... ... ड
" आमीलिक ... ... ... अ
" मेथिलिक ... ... ... ड
" इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेला ... अ
आमोनिया, इन् सोल्यूशन ... ... ... ब
युद्धसामग्री, यांत इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेली ... क
आस्फलाइन ... ... ... ... क
ब्यार्चिंग आइल्स, ७६° फारनहैट उष्णतामानाहून जास्त उष्णतामानावर पेट घेणारीं ... अ
सुरुंगाचें जिलाटैन .. .. ... ... क
सुरुंगाची दारू, शुल्टझची ... ... ... क
" आट्लसची ... ... ... क
" ब्रेनची ... ... ... क
" एरहार्डट्ची ... ... ... क
" हार्सलेची ... ... .... क
" हार्सलेची मूळची ... ... क
" रेन्हर्लेची ... ... ... क
" यांत इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेली ... क
सुरुंगाचे चार्ज, हॉचस्ट्याड्टरचे ... .... क
" रिचेनचे ... ... ... क
" साक्सिफ्राजाइन ... ... क
" यांत इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेले ... क
बेन्झाइन अगर बेन्झोल ... ... ... ड

बेन्झोलाइन ... ... ... ... ड
बायसल्फाइड आफ् कार्बन ... ... ... ड
ब्रोमाइन ... ... ... ... ब
काडतुसें ... ... ... ... क
क्लोरेट मिक्श्चर ... ... ... ... क
क्लोरेट्स, साधारणपणें सर्व ... ... ... क
क्लोराइड आफ् सल्फर ... ... ... ब
क्लोराइड्स आफ् फास्फरस ... ... ... क
कोलोडिऑन ... ... ... ... ड
कार्बो-एझोटाइन .. ... ... ... क
रंगीबेरंगी उडवावयाची दारू ... ... क
ज्वालाग्राही पदार्थ, यांत इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेले. क
कॉटनपौडर ... ... ... ... क
फटाकडे ... ... ... ... क
डिटोनेटर्स ... ... ... ... क
डायाझो बेन्झोल ... ... ... ... क
डुआलाइन ... ... ... ... क
डायोरेक्सिन ... ... ... ... क
डाइनमैट ... ... ... ... क
" अमोनिया ... ... ... क
" जिलाटैन ... ... ... क
इथर ... ... ... ... ... ड
इट्नाइट ... ... ... ... क
बारी रसायनें, यांत इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेलीं... क
बारी पदार्थ व बारी दारू, यांत इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेलीं ... ... ... ... क
धुक्याच्या सिग्नलीं... ... ... ... क
फार्टिस... ... ... ... ... क
दारूकाम ... ... ... ... क
" कांपोझिशन ... ... ... क
फल्मिनेट आफ् मर्क्यूरी ... ... ... क
" " सिल्व्हर ... ... ... क
फ्यूझ ... ... ... ... ... क
ग्यास, दाबून भरलेला; २९० वातावरणांचा (३७९० रतलांचा) दाब सहन करण्यास समर्थ आहेत असा ज्यांच्याबद्दल लायक अधिकाऱ्यानें दाखला दिला असेल तशा घडीव लोखंडाच्या

सिलिंडरांमध्यें अगर पोलादाच्या अखंड बिन-सांध्याच्या शिशांमध्यें बंदोबस्तानें भरलेला प्रवाही कार्बोनिक आसिड ग्यास शिवाय करून इतर ... ... ... ड

ग्यासोलाइन ... ... ... ... ड

गन-काटन ... ... ... ... क

,, पौडर ... ... ... क

,, क्लोरेटेड ... ... ... क

,, नैट्रेटेड ... ... ... क

बंदुकीची दारू ... ... ... ... क

ग्लायआक्सिलाइन ... ... ... क

गन पेपर ... ... ... ... क

गन सॉडस्ट ... ... ... ... क

आयोडाइड आफ् नैट्रोजन ... ... ... क

म्याचिज, कान्ग्रीव्ह ... ... ... क

,, ल्युसिफर ... ... ... क

,, व्हेसुव्हियन ... ... ... क

मेथिलिक नैट्रेट ... ... ... ... क

मेथिलेटेड स्पिरिट्स ... ... ... ड

म्यूरिएट आफ् टिन ... ... ... ब

माटाझिएट्टे ... ... ... ... क

मेगानाइट ... ... ... ... क

नाफ्था... ... ... ... ... ड

,, वूड अगर वूड स्पिरिट ... .... ड

नाफ्थालिन ... ... ... ... अ

नैट्रेट आफ् बेरियम ... ... . . क

,, आफ् आयर्न ... ... ... ब

,, आफ् स्ट्रान्टिआ ... ... ... क

,, आफ् डायाझो बेन्झोल ... ... क

नैट्रेट्स, धातूचे, इतर प्रकारें निर्दिष्ट न केलेले ... क

नैट्रो-ग्लिसराइन व त्याचे संयुक्तपदार्थ ... ... क

नैट्रो-मान्नाइट ... ... ... ... क

ऑइल-फ्यूझेल ... ... ... ... अ

,, ग्यास, आणि ज्या इतर कोणत्याहि पदार्थापासून ९०° फारनहैट उष्णतामानावर ज्वालाग्राही वाफ उत्पन्न होते तो पदार्थ ... ... ड

ऑइल, केरोसीन, ७६° फारनहैट उष्णतामानावर किंवा त्याहून जास्त उष्णतामानावर पेटणारें ... ... ... ... अ

,, केरोसीन, ७६° फारनहैट उष्णतामानाच्या आंत पेटणारें ... ... ... ड

,, पेट्रोलियम व इतर हायड्रो-कार्बन तेलें, शुद्ध केलेलीं किंवा कच्चीं, ज्यांतून ज्वालाग्राही ग्यास येत नाहीं अशीं ... ... .... अ

,, रंगून, ७६° फारनहैट उष्णतामानापेक्षां जास्त उष्णतामानावर पेट घेणारें ... अ

पाराफाइन ... ... ... ... अ

परक्लोराइड आफ् आयर्न ... ... ... ब

परकशन क्याप्स (तोट्या)... ... ... क

फास्फरस ... ... ... ... ब

,, अमार्फस ... ... ... ब

पेरालाईट ... ... ... ... क

युड्रोलाइथ ... ... ... ... क

पायरोलाइथ ... ... ... ... क

पिक्रेट्स ... ... ... ... क

पिक्रिक पौडर ... ... ... ... क

राकेट्स ... ... ... ... क

-हेक्झाइट ... ... ... ... क

रेक्टिफाइड स्पिरिट्स ... ... ... ड

रिप्-लेने ... ... ... ... क

सल्फेट आफ् इंडिगो, कान्सेन्ट्रेटेड ... ... ब

थ्यूटोनाइट ... ... ... ... क

वारी पदार्थ उडविण्यासाठीं नळ्या ... ... क

टोनाइट ... ... ... ... क

टर्पेन्टाइन ... ... ... ... ड

,, याचे स्पिरिट्स ... ... ... ड

व्हिगोराइट ... ... ... ... क

वार राकेट्स ... ... ... ... क

वुड स्पिरिट ... ... ... ... ड

क्झिलोइडाइन ... ... ... ... क

आणि सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट ह्याअन्वयें, जो कोणताही इतर पदार्थ त्या आक्टाचें कलम ४, रकम (१), * ह्यांत व्याख्या केल्याप्रमाणें बारी पदार्थ असेल, तो प्रत्येक पदार्थ.

"त्रासदायक माल" ह्मणून ठरविलेले पदार्थ.

१९. सन १८९०चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद आक्ट ह्याच्या कारणांसाठीं खालील पदार्थ त्रासदायक माल होत असें यावरून ठरविलें आहे; ते पदार्थ येणेंप्रमाणें :—

कुजलेला भाजीपाला, मासळी व मांस, आणि कुजलेल्या स्थितींत असणारा इतर कोणताही पदार्थ,

माणसांचीं प्रेतें,

जनावरांचीं प्रेतें,

हाडें,

म्युनिसिपालिटीच्या हद्दींतला अगर शहरांतला केरकचरा वगैरे,

खत, आणि

चिंध्या.

भयकारक माल नेण्यासाठीं घेणें.

१६. (१) रेलवेच्या मुख्याधिकाऱ्याकडून वेळोवेळीं जे कोणतेहि अपवाद जाहीर करण्यांत येतील त्यांस पात्र करून भयकारक माल नेण्यासाठीं घेणें तो,—

(अ) तो माल, सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट ह्याअन्वयें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कानू ज्यांस लागू असतील असे बारी पदार्थ असतील तर, तो त्या कानूंबरहुकुम प्याक केलेला आहे असा; आणि

(ब) इतर कोणत्याही बाबतींत, तो माल ह्या कानूंस जोडिलेल्या अ पुरवणींतल्या कानूंबरहुकुम प्याक केलेला आहे असा,

लेखी इक़रार कन्सैनरानें करून दिल्याशिवाय, घेतां नये.

(२) केरोसीन तेल, त्याचा ज्वलनबिंदु कन्सैनरानें कन्सैन्मेंट नोटवर लिहून दिलेला असल्याशिवाय, नेण्याकरितां घेऊं नये. ह्याप्रमाणें लिहून दिलेला ज्वलनबिंदु इन्व्हाइसमध्यें व रेलवेच्या पावतींत नोंदला पाहिजे.

(३) कानू १४ हींत क निशाणी केलेल्या प्रकारांपैकीं कोणत्याहि प्रकारचा माल, तो घेण्याची आपली तयारी आहे अशी [रेलवेच्या] कामगारांकडून सूचना मिळेपर्यंत नेण्यासाठीं रेलवेच्या जागेंत आणतां नये.

भयकारक मालासाठीं स्पेशल व्हानी.

१७. (१) रेलवेच्या मुख्याधिकाऱ्याकडून जे कोणतेहि अपवाद वेळोवेळीं जाहीर करण्यांत येतील त्यांस पात्र करून, कानू १४ हींत अनुक्रमें ब, क व ड ह्या निशाण्या केलेल्या प्रकारचा भयकारक माल, भयकारक माल नेण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या व्हानींतूनच मात्र नेण्याचा अख़्त्यार आहे:

* "४. या आक्टांत, विषयावरून किंवा संदर्भावरून बाध येत नसेल तर,—

(१) "बारी पदार्थ"—

(अ) या शब्दांचा अर्थ, बंदुकीची दारू, नैट्रो ग्लिसरीन, डिनेमैट, गनकॉटन, सुरंगाची दारू, पाऱ्याचा किंवा दुसऱ्या धातूचा फलिमिनेट, रंगारंगाचे अग्नि आणि बार होऊन व्यवहारांत एकादा परिणाम व्हावा किंवा दारूकामासारखा परिणाम व्हावा या हेतूनें उपयोग केलेला किंवा तयार केलेला दुसरा प्रत्येक पदार्थ असा समजावा, तो मग वर सांगितलेल्या पदार्थांसारखा असो किंवा नसो; आणि

(ब) या शब्दांत, धुक्याच्या निशाण्या (सिग्नलों), दारूकाम, फ्युझी, बाण, तोट्या, डिटोनेटर, काडतुसें, सर्व प्रकारची युद्धसामग्री आणि वर व्याख्या केली आहे त्या प्रकारच्या एकाद्या बारी पदार्थाच्या मदतीनें केलेला किंवा त्यापासून बनविलेला प्रत्येक पदार्थ, हीं येतात."

मात्र, ली-मेटफोर्ड, मार्टिनी-हेन्री आणि स्नायडर युद्धसामुग्री, सदरहू प्रकारच्या व्हानी मिळण्यासारख्या नसतील तेव्हां, साध्या झांकलेल्या वागनींतून नेण्याचा अखत्यार आहे.

(२) जेव्हां कोणताही भयकारक माल, ह्या कानूच्या (१) ल्या रकमेस अनुसरून किंवा अनुसरल्याशिवाय, सदरहू प्रकारच्या व्हानींतून न्यावयाचा असेल, तेव्हां तो, अशा व्हानींची तजवीज करण्यास पुरेशी सूचना दिली असल्याशिवाय, नेण्यासाठीं घेतां नये.

**भयकारक अगर त्रासदायक मालाचें भाडें अगाऊ देणें.**

१८. रेलवेच्या मुख्याधिकाऱ्याकडून जे कोणतेहि अपवाद वेळोवेळीं जाहीर करण्यांत येतील त्यांस पात्र करून, भयकारक अगर त्रासदायक मालाचें भाडें अगाऊ दिलें पाहिजे.

**भयकारक अगर त्रासदायक माल भरणें व उतरणें.**

१९. रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यानें इतर प्रकारें जाहीर केलेलें नसेल तर, भयकारक अगर त्रासदायक माल कन्सैनरानें भरून दिला पाहिजे आणि कन्सैनीनें उतरून घेतला पाहिजे.

**साधारण व्यापारी माल बारी पदार्थांबरोबर भरूं नये.**

२०. रेलवेच्या कोणत्याही नोकरानें साधारण व्यापारी माल एकाच वाहनांत बारी पदार्थांबरोबर भरतां नये.

**ज्यांत बारी पदार्थ आहेत अशा वाहनावर चिठ्ठी असणें.**

२१. जो रेलवेचा नोकर कोणत्याही वाहनांत बारी पदार्थ भरण्याच्या कामावर देखरेख करीत असेल, त्यानें, अशा वाहनाच्या प्रत्येक बाजूवर "dangerous Goods" (भयकारक माल) हे शब्द लिहिलेली चिठ्ठी ठेविली आहे असें पाहिलें पाहिजे.

**असंरक्षित दिवे व पेटलेले फाणस.**

२२. रेलवेच्या कोणत्याही नोकरानें, भयकारक माल ज्यांत आहे अशा कोणत्याही वाहनाजवळ कोणताही असंरक्षित दिवा किंवा कोणताहि पेटलेला फाणस नेऊं नये अगर ठेवूं नये.

**बारी पदार्थांनीं भरलेलीं वाहनें कोणत्या ट्रेनींनीं पाठवावयाचीं तें.**

२३. बारी पदार्थांनीं भरलेलीं वाहनें फक्त गुड्स ट्रेनीबरोबर, त्या ट्रेनीच्या पिछाडीस जोडून, पाठविलीं पाहिजेत; मात्र तीं पाठीमागच्या ब्रेक-व्हानीस लागून जोडतां नयेत:

मात्र, लश्करी शिपायांची युद्धसामग्री अगर इतर बारी पदार्थ यानीं भरलेलीं वाहनें पाठविणें तीं, ते शिपायी ज्या ट्रेनीमधून प्रवास करतील त्या ट्रेनीबरोबर पाठविण्याचा अखत्यार आहे; परंतु तीं वाहनें पुढील ब्रेक-व्हानीच्या लगत पाठीमागें जोडिलीं पाहिजेत.

**ब निशाणी केलेला भयकारक माल पासेंजर ट्रेनींतून पाठविणें.**

२४. कानू १४ हींत ब निशाणी केलेल्या प्रकारांपैकीं कोणत्याही प्रकारच्या भयकारक मालाची एक पेटी पासेंजर ट्रेनींतून पाठविण्याचा अखत्यार आहे.

**दावा न सांगितलेला भयकारक माल.**

२५. कोणताही भयकारक माल त्याच्या नेमलेल्या ठिकाणीं येऊन पोंचल्यावर तो, रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यानें जाहीर केलेल्या वेळाच्या आंत, कन्सैनीनें आपल्या स्वाधीन करून घेऊन तेथून नेला नाहीं तर, तो स्वाधीन करून घेण्यांत येई तोंपर्यंत, अगर सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद आक्ट, कलम ५६, ह्यांतील ठरावांअन्वयें किंवा इतर रीतीनें त्याची व्यवस्था करण्यांत येई तोंपर्यंत, तो ज्या वाहनांतून नेला असेल त्याच वाहनांत राहूं देण्याचा अखत्यार आहे.

**बारी पदार्थांविषयीं आक्ट व पिट्रोलियम आक्ट ह्यांअन्वयें केलेल्या कानू कायम आहेत.**

२६. (१) ह्या बाबींतल्या, आणि ह्या कानूंस जोडलेल्या अ पुरवणींतल्या कानू, सन १८८४चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट ह्याअन्वयें आणि सन १८८६चा पिट्रोलियम आक्ट ह्याअन्वयें केलेल्या कानूंत फेरफार करून केलेल्या नाहींत पण त्या सदरहू कानूंशिवाय आणखी आहेत असें समजावें.

(२) ज्या कानू सदरहू सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट याअन्वयें हल्लीं अमलांत असून रेलवेच्या संबंधाच्या आहेत त्या, ह्या कानूंस जोडिलेल्या ब पुरवणींत दिल्या आहेत.

---

## बाब ४ थी.

### उतारूंनीं व इतर मनुष्यांनीं केलेले अपराध, व शिक्षा.

दारू पिऊन झिंगल्याच्या बाबतींत अगर पीडा केल्याच्या बाबतींत स्टेशन मास्तराचीं कर्तव्यें.

२७. सन १८९० चा हिंदुस्थानचा रेलवेंबाबद आक्ट ह्याच्या १२०* व्या कलमांत उल्लेख केलेल्या कोणत्याही कृत्यापासून जो कोणताही उपद्रव होईल तो बंद करण्यासाठीं स्टेशन मास्तरानें सर्व प्रकारचे वाजवी उपाय योजिले पाहिजेत; आणि त्या कलमाअन्वयें कोणत्याही मनुष्यास रेलवेवरून काढून लाविलें तर, त्या स्टेशन मास्तरानें, जरूर असल्यास, त्या मनुष्यावर त्या कलमाअन्वयें फौजदारींत काम चालविण्याची तजवीज करण्याविषयीं हुकुम केला पाहिजे.

रेलवेच्या जागेवर तंबाखू वगैरे ओढणें, अगर उघडा दिवा किंवा विस्तव जवळ बाळगणें, अगर गाडींत उघडा दिवा किंवा पेटता फाणस ठेवणें.

२८. जो कोणताही मनुष्य—

(अ) कोणत्याही गुड्सशेडमध्यें किंवा स्टोरयार्डामध्यें तंबाखू वगैरे ओढतांना किंवा उघडा दिवा अगर विस्तव जवळ असतांना आढळून येईल, किंवा

(ब) रेलवेच्या नोकरानें अगर पोलीस अमलदारानें तसें न करण्याविषयीं ताकीद दिल्यानंतरही, गाडीमध्यें एकादा उघडा दिवा अगर खनिज तेलाचा पेटता फाणस राहूं देईल, किंवा

(क) रेलवेच्या नोकरानें अगर पोलीस अमलदारानें तसें न करण्याविषयीं ताकीद दिल्यानंतरही, रेलवेच्या जागेच्या इतर कोणत्याही भागांत तंबाखू वगैरे ओढीत राहील,

त्यास, सदहू कृत्य भयकारक आहे असें अधिकार मिळालेल्या अमलदारास वाटेल तर, रेलवेच्या जागेंतून तात्काळ काढून लाविलें पाहिजे.

रेलवेच्या जागेंत मनुष्यास येऊं न देणें.

२९. जो कोणताही मनुष्य इमानें इतबारें उतारू नसेल किंवा ज्याचें रेलवेच्या जागेंत कोणतेंही काम नसेल, त्याला स्टेशनच्या प्लाटफार्मावर किंवा रेलवेच्या जागेच्या कोणत्याही भागावर येऊं न देण्याचा रेलवेच्या मुख्याधिकाऱ्यास अख्त्यार आहे.

उतारूनें अपराध केला असतां स्टेशन मास्तरानें तपास करणें.

३०. जर कोणताही उतारू, कानू २७ अगर कानू २८ ह्यांत सांगितलेला नाहीं असा कोणताही अपराध करील, तर स्टेशन मास्तरानें त्या प्रकरणाचा ताबडतोब तपास केलाच पाहिजे, आणि आपल्या लगतच्या वरिष्ठ अमलदाराचा हुकुम (जरूर असल्यास, तारेनें) विचारून, काम चालवावयाचें त्या संबंधानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें केलें पाहिजे.

---

रेलवेवर झिंगलेले स्थितींत असणें अगर पीडा करणें.

* "१२०. रेलवेचे कोणत्याही गाडींतला अगर कोणत्याही रेलवेचे कोणत्याही भागावर असलेला जो कोणताही मनुष्य —

(अ) झिंगलेल्या स्थितींत असेल, किंवा

(ब) कोणतीही पीडा अगर असभ्यपणानें कोणतेंही कृत्य करील अगर बीभत्स शब्द बोलेल अगर शिव्या देईल, किंवा

(क) जाणूनबुजून आणि कायदेशीर सबब नसतां कोणत्याही उतारूचे सुखास हरकत करील अगर कोणताही दिवा विझवील,

त्यास दंडाची शिक्षा दिली पाहिजे व तो दंड पन्नास रुपयांपर्यंत ठरविण्याचा अख्त्यार आहे; शिवाय त्यानें जें भाडें दिलें असेल तें बुडेल, आणि त्यानें जो पास अगर जें तिकिट मिळविलें असेल अगर विकत घेतलें असेल तें रद्द होईल; आणि त्यास त्या रेलवेवरून काढून टाकण्याचा कोणत्याही रेलवेच्या नोकरास अख्त्यार आहे.

३१. ह्या कानू उतारूंकडून अगर इतर मनुष्यांकडून कोणत्याही प्रकारें मोडल्या न जाण्याविषयीं गार्डांनीं स्वतः झटलें पाहिजे. गार्डांनीं कानू मोडूं देऊं नयेत.

३२. सन १८९० चा हिंदुस्थानचा रेल्वेंबाबद आक्ट ह्याच्या १३१ व्या व १३२ व्या कलमांवरून दिलेला धरण्याचा अधिकार फारच जपून चालविला पाहिजे. धरणें.

३३. (१) जर कोणताही रेल्वेचा नोकर यांत खालीं सांगितलेल्या कानूंपैकीं कोणतीही कानू मोडील, तर तो खालीं लिहिल्याप्रमाणें शिक्षेस पात्र होईल, ह्मणजे:— रेल्वेच्या नोकरानीं कानू मोडल्याबद्दल शिक्षा.

| कानू. | शिक्षा |
|---|---|
| ९, २० किंवा २२ ... ... ... .... | पन्नास रुपयांपर्यंत दंड. |
| ... ... ... ... | दाहा रुपयांपर्यंत दंड. |

(२) रेल्वेच्या कोणत्याही नोकरानें ह्या कानूच्या (१) ल्या रकमेंत सांगितलेल्या कानूंपैकीं कोणतीही कानू मोडली असतां तो त्या रकमेवरून फर्माविलेल्या ज्या शिक्षेस पात्र होतो ती शिक्षा, त्यावर सन १८९० चा हिंदुस्थानचा रेल्वेंबाबद आक्ट ह्याअन्वयें फौजदारींत काम चालविलें असतां तो ज्या कोणत्याही शिक्षेस पात्र होईल त्या शिक्षेच्या ऐवजीं नसून, त्या शिक्षेशिवाय आणखी आहे असें समजावें:

मात्र, त्यावरून कोणताही रेल्वेचा नोकर एकाच अपराधाबद्दल दोनदा शिक्षा होण्यास पात्र होतो असें समजूं नये.

---

## पुरवणी अ.

[ कानू १४ वी व १६ वी पहा. ]

**(सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट ह्याअन्वयें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कानू ज्या बारी पदार्थांस लागू असतील ते बारी पदार्थ खेरीज करून इतर) भयकारक माल प्याक करण्याबाबद.**

### १.—कानू १४ हींत अ निशाणी केलेला माल.

(१) कानू १४ हींत अ निशाणी केलेला माल, भयकारक माल नेण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या व्हानींमध्यें भरावयाचा नसेल तेव्हां तो, बाहेर निघून येऊं नये ह्मणून, टिनच्या मजबूत डब्यांमध्यें अगर कॉर्कांचीं बूचें बसविलेल्या मोहरबंद बाटल्यांमध्यें बंदोबस्तानें प्याक केला पाहिजे, आणि असे डबे किंवा बाटल्या लांकडी पेट्यांमध्यें भरून बंद केल्या पाहिजेत. बाटल्यांचा उपयोग केला असेल तेव्हां, त्यांच्या सभोंवतीं पेंढ्याचें अगर भुशाचें वेष्टण असलें पाहिजे. मात्र, ज्याचा ज्वलनबिंदु ७६° फारनहैट उष्णतामानावर किंवा त्याहून जास्त उष्णतामानावर असेल तें केरोसीन तेल मजबूत लोखंडी किंवा पोलादाच्या पिपांमध्यें भरलें असतां चालेल.

### २.—कानू १४ हींत ब निशाणी केलेला माल.

(२) कानू १४ हींत ब निशाणी केलेला माल, स्टोनवेअर (चिनी मातीच्या) बरण्यांमध्यें किंवा कांचेचें बूच असलेल्या बाटल्यांमध्यें बंदोबस्तानें भरून ह्या बरण्या किंवा बाटल्या उतरत्या झांकणांच्या पेट्यांमध्यें उभ्या बसवून बंद केल्या पाहिजेत:

मात्र—

(अ) फ्लुआरिक आसिड, शिशाच्या किंवा गटापर्चाच्या बाटल्यांमध्यें भरलें पाहिजे,

(ब) आमोनियाचें सोल्यूशन धातूच्या बाटल्यांमध्यें भरून त्यांचीं झांकणें डांखानें बसविलीं पाहिजेत, आणि

(क) सल्फ्यूरिक आसिड कॉर्कांचीं अगर लांकडाचीं बुचें असलेल्या बरण्यांमध्यें भरतां नये.

(३) ब्रोमाइन, म्यूरिआटिक आसिड, नैट्रिक आसिड, आकाफार्टिस अगर आमोनियाचें सोल्यूशन ह्यानें भरलेल्या बाटल्या, वाफेला प्रसरण पावण्यास जागा सांपडावी ह्मणून, फक्त तीन चतुर्थांश भरल्या पाहिजेत.

(४) कान्सेन्ट्रेटेड मिनरल आसिडें भरलेल्या पेट्यांच्या बाबतींत आंतील प्याकिंग, जींत कोळसे नाहींत अशा राखेचें, किंवा खडू, रेती अगर सुकी माती यांचें असलें पाहिजे. इतर बाबतींत आंतील प्याकिंग पेंढ्याचें, कोंड्याचें अगर भुशाचें असून त्यांत दगडी कोळसा, लांकडाची राख, खडू किंवा रेती मिसळलेली असली पाहिजे.

(५) कोणत्याही एका पेटीमध्यें, कानू १४ हींत ब निशाणी केलेल्या मालापैकीं फक्त एकाच जातीचा माल भरण्याचा अख्त्यार आहे. तींत आणखी इतर कोणत्याही जातीचा माल भरूं नये.

(६) प्रत्येक पेटीचें वजन दोन मणांहून जास्त असूं नये:

मात्र, सल्फ्यूरिक आसिड भरलेली पेटी पराकाष्ठा अडीच मण वजनापर्यंत प्याक करण्यास हरकत नाहीं.

## ३.—कानू १४ हींत क निशाणी केलेला माल.

(७) (१) कानू १४ हींत क निशाणी केलेला जो माल, सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट ह्याअन्वयें त्या त्या वेळीं अमलांत असलेल्या कानू लागू असलेले बारी पदार्थ नसेल तो माल, आंतून धातूच्या पत्र्यानें मढविलेल्या व आंत धूळ मुळींच जाणार नाहीं अशा मजबूत लांकडी डब्यांमध्यें प्याक केला पाहिजे.

(२) अशा कोणत्याही डब्यांत सदरहू प्रकारचा माल एका पौंडाहून जास्त असतां नये, आणि कोणत्याही पेटींत किंवा प्याकेजांत असे डबे दाहांपेक्षां जास्त असतां नयेत.

## ४.—कानू १४ हींत ड निशाणी केलेला माल.

(८) कानू १४ हींत ड निशाणी केलेला माल, त्या कानूमधील ब निशाणी केलेला माल ज्या रीतीनें प्याक करावा ह्मणून यांत पूर्वीं सांगितलें आहे त्या रीतीनें प्याक केला पाहिजे:

मात्र—

(अ) मेथिलेटेड अगर रेक्टिफाइड स्पिरिट्स आफ् वाइन, कॉर्कचें बूच मारून टोपण बसवलेल्या बाटल्यांमध्यें अगर पिपांमध्यें भरून त्या बाटल्या अगर तीं पिपें बंदोबस्तानें प्याक केलीं पाहिजेत,

(ब) टर्पेन्टाइन, कॉर्कचें बूच मारून टोपण बसविलेल्या बाटल्यांमध्यें अगर योग्य रीतीनें डांखानें बंद केलेल्या पिपांमध्यें किंवा टिनच्या डब्यांमध्यें भरून, त्या बाटल्या, पिपें अगर डबे लांकडी पेट्यांमध्यें बंदोबस्तानें प्याक केले पाहिजेत,

(क) कानू १४ हींत ड निशाणी केलेला इतर कोणताही माल, स्टोनवेअर ( चिनी मातीच्या ) बरण्यांमध्यें किंवा कांचेचीं बुचें असलेल्या बाटल्यांमध्यें, अगर मळसूत्राचीं किंवा कॉर्कचीं बुचें असलेल्या व तोंडावर डांखानें टोपणें बसविलेल्या ( कथील किंवा तांबें यांसारख्या ) धातूच्या पात्रांमध्यें प्याक केला पाहिजे, आणि

(ड) कानू १४ हींत ड निशाणी केलेल्या मालापैकीं निरनिराळ्या प्रकारचा माल एकाच पेटींत भरण्यास हरकत नाहीं, परंतु त्या पेटीमध्यें त्या मालाबरोबर, त्या कानूंत अनुक्रमें अ, ब व क निशाणी केलेल्या प्रकारचा कोणताही माल भरतां नये.

---

## पुरवणी ब.

[ बाब ३, कानू १६ आणि २६ पहा ].

हिंदुस्थान सरकारच्या होम डिपार्टमेंट ( पब्लिक ) चे जाहिरनामे, तारीख २४ माहे जून सन १८८७ चा नंबर १४१७, तारीख २० माहे जून सन १८९० चा नंबर ११९१, तारीख ३० माहे दिजेंबर सन १८९२चा नंबर २३६९ आणि तारीख ४ माहे जानुआरी सन १८९४ चा नंबर १२.

## सन १८८४ चा हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयीं आक्ट याअन्वयें हल्लीं अमलांत असलेल्या रेलवेच्या संबंधाच्या कानू.

प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या कानूंच्या कारणांसाठीं बारी पदार्थांचे खालीं लिहिल्याप्रमाणें वर्ग केले आहेत असें समजावें, ह्मणजे :—

वर्ग १ —बंदुकीची दारू.
,, २ —नैट्रेट-मिक्श्चर.
,, ३ —नैट्रो-कांपौंड.
,, ४ —क्लोरेट-मिक्श्चर.
,, ५ —फल्मिनेट.
,, ६ —युद्धसामग्री.
,, ७ —दारूकाम.

आणि जेव्हां एकाद्या बारी पदार्थास एका वर्गाहून अधिक वर्गांचें वर्णन लागू असेल, तेव्हां ज्या वर्गांचें वर्णन त्यास लागू असेल त्यांतील वरील अनुक्रमाप्रमाणें फक्त शेवटल्याच वर्गाचा तो आहे असें समजलें पाहिजे.

### वर्ग १.—बंदुकीच्या दारूचा वर्ग.

"बंदुकीची दारू" या शब्दांचा अर्थ, जीस बंदुकीची दारू असें साधारणतः ह्मणतात तीच मात्र बंदुकीची दारू असा आहे.

### वर्ग २.—नैट्रेट-मिक्श्चरचा वर्ग.

"नैट्रेट-मिक्श्चर" या शब्दांचा अर्थ, जिला बंदुकीची दारू असें साधारणतः ह्मणतात ती बंदुकीची दारू शिवाय करून, ज्यांत बारी गुण नाहींत अशा कोणत्याहि रूपाच्या कारबनाशीं किंवा कारबनच्या कोणत्याहि पदार्थाशीं कोणत्यातरी नैट्रेटचें नुस्तें मिश्रण करून बनविलेला कोणताहि दुसरा पदार्थ असा आहे; अशा तयार केलेल्या पदार्थांत मग गंधक घातलेला असो किंवा नसो, आणि असा तयार केलेला पदार्थ, बारी नसणाऱ्या दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाबरोबर नुस्ता मिश्र केलेला असो किंवा नसो.

नैट्रेट-मिक्श्चरच्या वर्गांत—

पैरोलाइथ,
प्युड्रोलाइथ,
पुडर साक्सिफ्राजाइन,

यांसारखे बारी पदार्थ आणि वरील व्याख्या ज्यास लागू आहे असा तयार केलेला कोणताहि पदार्थ, यांचा समावेश होतो.

### वर्ग ३.—नैट्रो-कांपौंडचा वर्ग.

"नैट्रो-कांपौंड" या शब्दांचा अर्थ, नैट्रिक आसिडाची (तें नैट्रिक आसिड मग सल्फ्यूरिक आसिडाशीं मिश्र झालेलें असो किंवा नसो), किंवा सल्फ्यूरिक आसिडाशीं मिश्र झालेल्या नैट्रेटाची, कोणत्याहि कारबनच्या पदार्थावर रसायनक्रिया घडून जो उत्पन्न झाला असून ज्यांत बार होण्याचे गुण असतील किंवा जो धातूंशीं संयोग पावून एकादा बारी संयुक्तपदार्थ उत्पन्न करण्यास शकत असेल असा कोणताहि रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला संयुक्तपदार्थ; अशा संयुक्तपदार्थांचें मग दुसऱ्या पदार्थांबरोबर नुस्तें मिश्रण झालेलें असो किंवा नसो.

नैट्रो-कांपौंडच्या वर्गाचे दोन भाग आहेत :—

भाग १ यांत—

नैट्रो-ग्लिसरीन,
डायनमैट,
लिथोफ्रयाक्यूर,
डुअलाइन,

ग्लायआक्सिलाइन,

मिथिलिक नैट्रेट,

यांसारखे बारी पदार्थ, आणि ज्यांत सर्वांशीं किंवा अंशतः नैट्रो-ग्लिसरीन किंवा दुसरा एकादा प्रवाही नैट्रो-कांपौंड आहे असा कोणताहि रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला संयुक्तपदार्थ किंवा असा कोणताहि नुसतें मिश्रण करून तयार केलेला पदार्थ, यांचा समावेश होतो.

भाग २ यांत—

गन-काटन असें ज्यास साधारणपणें नांव आहे तो,

गन-पेपर,

क्सायलोइडाइन,

गन सॉडस्ट,

नैट्रेटेड गनकाटन,

काटन गनपौडर,

शुल्टझची पौडर,

नैट्रो मान्नैट,

पिक्रेट्स,

पिक्रिक पौडर,

टोनाइट (अगर काटन पौडर),

यांसारखे बारी पदार्थ, व पूर्वी व्याख्या केलेल्या प्रकारचा असून पहिल्या भागांत आलेला नाहीं असा कोणताहि नैट्रो-कांपौंड, यांचा समावेश होतो.

## वर्ग ४.—क्लोरेट-मिक्श्चरचा वर्ग.

"क्लोरेट-मिक्श्चर" या संज्ञेचा अर्थ, ज्यांत एकादें क्लोरेट आहे असा कोणताहि बारी पदार्थ असा आहे. क्लोरेट-मिक्श्चरच्या वर्गाचे दोन भाग आहेतः—

भाग १ यांत—

हार्सलेची सुरुंगाची दारू,

ब्रेनची किता किता.

यांसारखे बारी पदार्थ, आणि ज्यांत अंशतः नैट्रो-ग्लिसरीन किंवा दुसरा एकादा प्रवाही नैट्रो-कांपौंड आहे असा कोणताहि क्लोरेटचा तयार केलेला पदार्थ, यांचा समावेश होतो.

भाग २ यांत—

हार्सलेची मूळची सुरुंगाची दारू,

एरहार्डट्ची पौडर,

रेन्हर्लेची पौडर,

ह्याचस्व्याड्टरचे सुरुंगाचे चार्ज,

रिचेनचे सुरुंगाचे चार्ज,

स्प्रूटेनैट,

*क्लोरेटेड गनकाटन,

यांसारखे बारी पदार्थ, व पूर्वी व्याख्या केलेल्या प्रकारचें असून पहिल्या भागांत आलेलें नाहीं असें कोणतेंहि क्लोरेट-मिक्श्चर, यांचा समावेश होतो.

## वर्ग ५.—फल्मिनेटचा वर्ग.

"फल्मिनेट" या शब्दाचा अर्थ, ज्यांत बार होण्याजोगा गुण फार असल्यामुळें जो तोट्यांत * किंवा बार काढण्याच्या दुसऱ्या कोणत्याहि साधनांत उपयोग करण्याला योग्य आहे, किंवा जो बार होण्यास अत्यंत पात्र असल्या-

* तांब्याचा फटाकडा.

मुळें व फार अस्थिर असल्यामुळें (ह्मणजे, ज्याचे घटकावयव फारच थोडक्या उद्दीपक कारणांवरून लागलेच निरनिराळे होण्यासारखे असल्यामुळें) विशेषेंकरून भयंकर आहे, असा रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला कोणताहि संयुक्तपदार्थ किंवा नुसतें मिश्रण होऊन झालेला कोणताहि पदार्थ, असा आहे; अशा पदार्थांचा भग वर सांगितलेल्या वर्गांमध्यें समावेश होवो किंवा न होवो.

ह्या वर्गाचे दोन भाग आहेत:—

**भाग १** यांत, रुप्याच्या व पाऱ्याच्या फल्मिनेटांसारखे संयुक्त पदार्थ, आणि तोट्या करण्यांत ज्यांचा उपयोग करण्यांत येतो तसे सदहू जिनसांपासून तयार केलेले पदार्थ, आणि कारबनच्या पदार्थांसहित किंवा कारबनच्या पदार्थांवांचून फास्फरसच्या बरोबर झालेलें, किंवा कांहीं विशेष प्रकारचे फास्फरसचे संयुक्तपदार्थ यांच्या बरोबर झालें कोणत्या तरी क्लोरेटाचें मिश्रण ज्यांत आहे असा तयार केलेला कोणताहि पदार्थ, आणि कारबनच्या पदार्थांसहि किंवा कारबनच्या पदार्थांवांचून गंधकाशीं झालेलें, किंवा कोणत्या तरी सल्फ्युरेटाशीं झालेलें, एकाद्या क्लोरेटाचें मिश्रण ज्यांत आहे असा तयार केलेला कोणताहि पदार्थ, यांचा समावेश होतो.

**भाग २** यांत, नैट्रोजनचा क्लोरैड व ऐओडैड, फल्मिनेटिंग सोनें व रुपें, डायाझोबेनझोल, व डायाझोबेनझोलचा नैट्रेट, अशा पदार्थांचा समावेश होतो.

## वर्ग ६.—युद्धसामग्रीचा वर्ग.

"युद्धसामग्री" या शब्दाचा अर्थ, लहान हत्यारें, तोफा किंवा दुसरें कोणतेंहि शस्त्र यांकरितां किंवा सुरुंग लावण्याकरितां काडतूस किंवा भरण्याचा बार होईल, किंवा सुरुंग लावण्यासाठीं किंवा कुलपी गोळ्यांसाठीं कोणतीहि सेफ्टी किंवा दुसऱ्या प्रकारची * फूज होईल, किंवा बारी पदार्थ पेटविण्याकरितां कोणतीहि नळी होईल, किंवा तोटी, डिटोनेटर, धुक्याची सिग्नल (निशाणी), कुलपी गोळा, टार्पिडो, लढाईचा बाण, किंवा दारूकामाशिवाय दुसरें युक्तीचें साधन होईल अशा रीतीनें वर सांगितलेल्या वर्गांतून कोणत्याहि वर्गाचा कोणता तरी बारी पदार्थ जेव्हां कोणत्याहि कोशांत, किंवा दुसरे कांहीं युक्तीनें साधन तयार करून त्यांत घातलेला असेल, किंवा इतर प्रकारें योग्य असेल किंवा तयार केलेला असेल तेव्हां तो बारी पदार्थ, असा आहे.

"तोटी" या शब्दांत डिटोनेटरचा समावेश होत नाहीं.

'डिटोनेटर' या शब्दाचा अर्थ, ज्या डबीची किंवा कोशाची शक्ति व रचना अशी असते कीं व जींत किंवा ज्यांत फल्मिनेट बारी पदार्थाच्या वर्गांतील कोणता तरी बारी पदार्थ अशा प्रमाणानें भरलेला असतो कीं तशी एक डबी किंवा कोश बार होऊन उडाली किंवा उडाला असतां तेणेंकरून दुसऱ्या तशाच डब्या किंवा कोश बार होऊन उडतात, अशी कोणतीहि डबी किंवा कोश.

"सेफ्टी फूज" या शब्दांचा अर्थ, सुरुंग लावण्याकरितां फूज असा आहे; ही फूज जळते परंतु हिचा बार होत नाहीं, व हींत पेटण्याचें स्वतः आंगचें साधन नाहीं, व हिची शक्ति व रचना अशी असते कीं व हींत कोणता तरी बारी पदार्थ अशा प्रमाणानें भरलेला असतो कीं, अशी फूज पेटल्यानें बाजूच्या तशाच दुसऱ्या फूजी पेट घेत नाहींत.

"सेफ्टी काडतुसें" या संज्ञेचा अर्थ, ज्या काडतुसांचा कोश बार केल्यानंतर लहान हत्यारांतून काढतां येतो व जीं अशा रीतीनें बंद केलेलीं असतात कीं एका काडतुसाचा कोणत्याहि प्रकारें बार झाला तरी तेणेंकरून दुसऱ्या काडतुसांचा बार होत नाहीं, अशीं लहान हत्यारांसाठीं काडतुसें असा आहे.

युद्धसामग्रीच्या वर्गाचे तीन भाग आहेत:

**भाग १** यांत—

सेफ्टी काडतुसें,
सुरुंग लावण्याच्या सेफ्टी फूजी,
रेलवेच्या धुक्याच्या सिग्नली (निशाण्या),
तोट्या,

ह्यांचाच मात्र समावेश होतो.

---

* रंजूक नळी.

**भाग** २ यांत, जी वर व्याख्या केलेल्या प्रकारची असून जिच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन नाहीं व जी १ ल्या भागांत आलेली नाहीं अशी कोणतीहि युद्धसामग्री येते, उदाहरणार्थ—

सेफ्टी काडतुसें नाहींत अशीं लहान हत्यारांचीं काडतुसें,
तोफा, कुलपी गोळे, खाणी, सुरुंग यांकरितां किंवा अशाच दुसऱ्या कारणांकरितां काडतुसें व भरण्याचे बार,
कोणताहि बारी पदार्थ ज्यांत आहे असे कुलपी गोळे व टार्पिडो,
सेफ्टी फूजी नाहींत अशा सुरुंगाकरितां फूजी,
कुलपी गोळ्यांकरितां फूजी,
बारी पदार्थ उडविण्याकरितां नळ्या,
लढाईचे बाण,

कीं ज्यांच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन नाहीं.

**भाग** ३ यांत, जी वर व्याख्या केलेल्या प्रकारची असून जिच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन आहे व जी १ ल्या भागांत आलेली नाहीं अशी कोणतीही युद्धसामग्री येते, उदाहरणार्थ—

डिटोनेटर,
सेफ्टी काडतुसें नाहींत अशीं सगळ्या लहान हत्यारांचीं काडतुसें,
सेफ्टी फूजी नाहींत अशा सुरुंगाकरितां फूजी,
कुलपी गोळ्यांकरितां फूजी,
बारी पदार्थ उडविण्याकरितां नळ्या,

कीं ज्यांच्यामध्यें पेटण्याचें स्वतः आंगचें साधन असतें.

पेटण्याचें स्वतः आंगचें साधन असणारी युद्धसामग्री या शब्दांचा अर्थ, जिच्यामध्यें अशी योजना केलेली असते कीं त्या योजनेच्या योगानें, घर्षण झालें असतां किंवा ठोका बसला असतां, जी बार होऊन उडते किंवा पेट घेते अशी युद्धसामग्री; सदहू योजना मग त्या युद्धसामग्रीस जोडलेली असो किंवा तिचाच भाग असो.

### वर्ग ७.—दारूकामाचा वर्ग.

"दारूकाम" या शब्दांत, दारूकामाची दारू व तयार केलेलें दारूकाम हीं येतात.

**भाग** १.—"दारूकामाची दारू" या शब्दांचा अर्थ, ज्याचा तयार केलेलें दारूकाम बनविण्यासाठीं उपयोग करण्यांत येतो, व जो बारी पदार्थांच्या मागें सांगितलेल्या वर्गांमध्यें येत नाहीं असा कोणताही बारी किंवा पेट घेणाऱ्या प्रकारचा, रसायनक्रियेनें उत्पन्न झालेला संयुक्तपदार्थ किंवा नुस्तें मिश्रण करून बनविलेला पदार्थ, आणि तशीच रंगारंगाचे अग्नीची कोणतीहि दारू, असा आहे.

**भाग** २.—'तयार केलेलें दारूकाम' या शब्दांचा अर्थ, ज्यापासून *स्किब, फटाकडा, साप, (लढाईच्या बाणाखेरीज इतर प्रकारचा) बाण, †मरून, चांदणी, ‡ल्यान्स, चक्र, चैनीझ फायर, रोमन क्यांडल, किंवा दारूकामाचे परिणाम अगर दारूकामाच्या सिग्नली उत्पन्न करण्यालायक दुसरा कोणताहि पदार्थ तयार होईल अशा रीतीनें मागें सांगितलेल्या वर्गांतील कोणताही बारी पदार्थ किंवा कोणतीहि दारूकामाची दारू जेव्हां कोणत्याहि कोशांत किंवा युक्तीनें कोणतेंहि साधन तयार करून त्यांत घातलेला किंवा घातलेली असेल, किंवा इतर प्रकारें तयार केली किंवा केला असेल तेव्हां तो बारी पदार्थ व ती दारूकामाची दारू असा समजावा.

### एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेणें.

#### (अ).—प्याक करणें.

२. पुढील सामान्य कानू, बारी पदार्थ नेण्याच्या कारणासाठीं, प्याक करण्याच्यासंबंधानें पाळिल्या पाहिजेत:,

१—प्रत्येक वर्गाचा बारी पदार्थ निरनिराळा प्याक केला पाहिजे.

*एका प्रकारचें दारूचें कंवठ. † चंद्रजोत. ‡ एका प्रकारचा बाण.

२.—एकादा बारी पदार्थ ५ व्या (फल्मिनेटच्या) वर्गांतील, अगर ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या २ऱ्या व ३ ऱ्या भागांतील, अगर ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ नसून, त्याचें परिमाण ५ रतलांहून अधिक नसेल तर, तो बारी पदार्थ, जेणेंकरून तो बाहेर निघून येणार नाहीं अशा रीतीनें तयार केलेल्या व अशा रीतीनें बंद केलेल्या एकाद्या मजबूत पेटींत, पोत्यांत, डब्यांत अगर इतर पात्रांत भरलेला असला पाहिजे.

३.—१ल्या (बंदुकीच्या दारूच्या) वर्गांतील एकाद्या बारी पदार्थाचा सुरुंगाच्या कामांकडे उपयोग करावयाचा उद्देश असेल तर, तो बारी पदार्थ मेणकापड अगर गोणपाट यानें वेष्टिलेल्या पिपांतून नेला असतां चालेल.

४.—इतर प्रत्येक बाबतींत बारी पदार्थ दुहेरी प्याकेजांत भरलेला असला पाहिजे. त्यांपैकीं आंतील प्याकेज, जेणेंकरून तो बारी पदार्थ बाहेर निघून येणार नाहीं अशा रीतीनें तयार केलेली व बंद केलेली मजबूत पेटी, पोतें, डबा अगर इतर पात्र असलें पाहिजे, व बाहेरील प्याकेज लांकडाची अगर धातूची अगर इतर मजबूद पदार्थाची पेटी, पीप, अगर केस (पेटी) असून ती पेटी, पीप अगर केस हिची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून धोका येऊं नये, व तींतून तो बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये:

मात्र इतकेंच कीं:—

(अ) सदर्हू बारी पदार्थ १ ल्या (अगर बंदुकीच्या दारूच्या) वर्गांतील अगर २ ऱ्या (नैट्रेट मिक्श्चरच्या) वर्गांतील बारी पदार्थ असेल, अगर ३ ऱ्या (नैट्रो-कांपौंडच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील गन काटन अगर दुसरा एकादा बारी पदार्थ असेल, तर पहिल्या दोन वर्गांच्या बारी पदार्थांच्या बाबतींत बाहेरील कोणत्याहि एका प्याकेजांतील बारी पदार्थाचें परिमाण १०० रतलांहून अधिक नसावें, व शेवटच्या वर्गाच्या बारी पदार्थाच्या बाबतींत ५० रतलांहून अधिक नसावें; आणि तो बारी पदार्थ गनकाटन असेल तर तो नेतांना पाण्यांत चिंब भिजविलेला असला पाहिजे;

(ब) सदर्हू बारी पदार्थ ३ ऱ्या (नैट्रो-कांपौंडच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील अगर ४ थ्या (क्लोरेट-मिक्श्चरच्या) वर्गांतील असेल तर, आंतील प्याकेज बनवितांना त्यांत कोणत्याहि धातूचा उपयोग केलेला असतां कामा नये व आंतील अगर बाहेरील प्याकेज अगर दोन्हीहि प्याकेजें, त्यांतून पाणी मुळींच आंत शिरणार नाहीं अशीं असलीं पाहिजेत. आंतील प्याकेजांपैकीं प्रत्येकांत १० रतलांहून अधिक जिन्नस असूं नये, व बाहेरील कोणत्याहि एका प्याकेजांत बारी पदार्थाचें परिमाण एकंदरींत ५० रतलांहून अधिक नसावें;

(क) सदर्हू बारी पदार्थ ५ व्या (फल्मिनेटच्या) वर्गांतील असेल तर तो, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल विशेष प्रकारें फर्मावितील त्या रीतीनें प्याक केला पाहिजे;

(ड) सदर्हू बारी पदार्थ ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील असेल अगर २ ऱ्या भागांतील कोणताहि बारी पदार्थ असेल, तर बाहेरील प्याकेज असण्याची जरूरी नाहीं, परंतु तो बारी पदार्थ १०० रतलांहून जास्त परिमाणाचा नाहीं इतका एकाच प्याकेजांत भरलेला असण्यास हरकत नाहीं. सदर्हू प्याकेज ¾ इंचाहून कमी जाडीची नाहीं अशी एकादी पेटी, पीप अगर केस (पेटी) असून तिची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं ती नेतांना फुटूं नये किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून धोका येऊं नये, व तींतून तो बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये;

(ई) सदर्हू बारी पदार्थ ६ व्या (युद्धसामग्रीच्या) वर्गाच्या ३ ऱ्या भागांतील असेल तर तो दुहेरी प्याकेजांत प्याक केला पाहिजे. आंतील प्याकेजांत असा बारी पदार्थ २ रतलांहून जास्ती असूं नये, व बाहेरील प्याकेजांत ५० रतलांहून जास्ती असूं नये;

(फ) सदर्हू बारी पदार्थ ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या १ ल्या भागांतील असेल तर तो दुहेरी प्याकेजांत भरलेला असला पाहिजे. आंतील प्याकेज, हवा आंत न जाई अशा प्रकारें बंद केलेला एकादा मजबूत डबा, केस अगर इतर पात्र असून, त्यांत १ रतलाहून अधिक बारी पदार्थ असूं नये, व बाहेरील प्याकेजांत २० रतलांहून अधिक असूं नये; आणि

(ग) सदर्हू बारी पदार्थ ७ व्या (दारूकामाच्या) वर्गाच्या २ ऱ्या भागांतील असेल तर तो, लांकडाच्या, धातूच्या अगर इतर मजबूत पदार्थाच्या पेटींत, पिपांत अगर केसमध्यें, भरलेला असला पाहिजे, व ती पेटी,

पीप अगर केस हिची बळकटी, रचना व तऱ्हा हीं अशीं असलीं पाहिजेत कीं, ती नेतांना फुटूं नये किंवा सहजगत्या उघडली जाऊं नये किंवा तिच्यांत कांहीं कमीपणा होऊं नये अगर तिजपासून धोका येऊं नये, व तींतून तो बारी पदार्थ बाहेर निघून येऊं नये, व कोणत्याहि एका प्याकेजांतील बारी पदार्थाचें परिमाण १०० रतलांहून अधिक असूं नये.

९.—बारी पदार्थ कितीहि असला, व तो कोणत्याहि वर्गातील अगर वर्गाच्या भागांतील असला, तथापि पुढें सांगितलेल्या शर्ती पाळिल्या पाहिजेत:—

(अ) प्रत्येक प्याकेजाच्या आंतील बाजूला, तें प्याकेज मग एकेरी असो अगर दुहेरी असो, रेती वगैरे राहूं देऊं नये व ती बाजू इतर प्रकारें स्वच्छ ठेविली पाहिजे;

(ब) ज्या ज्या प्याकेजाचा, तें मग एकेरी असो अगर दुहेरी असो, बारी पदार्थ प्याक करण्यासाठीं वास्तविक उपयोग केला असेल तशा प्रत्येक प्याकेजाचा, त्याच किंवा इतर कोणत्याहि वर्गातील इतर कोणताहि बारी पदार्थ प्याक करण्यासाठीं किंवा इतर कोणत्याहि कामासाठीं उपयोग करितां कामा नये;

(क) सदहू प्रकारचें कोणतेंहि एकेरी प्याकेज अगर आंतील किंवा बाहेरील प्याकेज तयार करण्याच्या कामीं कोणतेंहि लोखंड किंवा पोलाद, तें कथलानें, जस्तानें अगर दुसऱ्या एकाद्या योग्य पदार्थानें सबंध मढविलें असल्याशिवाय, वापरतां नये.

(ड) अगदी बाहेरच्या प्याकेजावर "बारी पदार्थ" हे शब्द व त्यांपुढें त्या बारी पदार्थाचें नांव अगर आंतील पदार्थांचें इतर वर्णन, व मालकांचीं अगर पाठविणाराचें नांव व पत्ता हीं डाग देऊन किंवा मजबूत लेबल लावून किंवा लिहून, ढळढळीत अक्षरांनीं लाविलीं पाहिजेत.

(इ) कोणत्याहि एकेरी प्याकेजांतील, अगर दुहेरी प्याकेज असल्यास कोणत्याहि एका बाहेरील प्याकेजांतील, बारी पदार्थाचें परिमाण, स्थानिक सरकारानें ह्या बाबतींत नेमलेल्या अधिकाऱ्याच्या संमतीशिवाय व त्यानें पसंत केलेल्या शर्तीअन्वयें असल्याखेरीज, वर सांगितलेल्या कानूंत दर्शविल्यापेक्षां ज्यास्त असूं नये.

३ नेण्याच्या कारणासाठीं बारी पदार्थ प्याक करण्याच्या संबंधानें सदरीं सांगितलेल्या कानूंपैकीं कोणतीहि एकादी कानू कोणत्याहि मनुष्यानें मोडल्यास, त्याला १००० रु० पर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(ब).—नेण्याची रीति.

४. पुढील सामान्य कानू बारी पदार्थ नेण्याच्या संबंधानें पाळिल्या पाहिजेत:—

१.—सदरीं सांगितलेल्या कानूंत ठरविलेल्या रीतीनें प्याक केलेला नसेल तर कोणताहि बारी पदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊं नये.

२.—एकादा बारी पदार्थ नेण्यासाठीं जिचा उपयोग होत आहे अशा प्रकारच्या कोणत्याहि गाडींतून किंवा तारवांतून, ज्यांत पेटण्याचें आंगचें साधन आहे असा सदहू प्रकारच्या बारी पदार्थाहून भिन्न वर्गातील व भागांतील कोणत्याच प्रकारचा कोणताहि बारी पदार्थ, अशा प्रकारच्या एका बारी पदार्थास आग लागली असतां किंवा तो पदार्थ बार होऊन उडाला असतां तेणेंकरून सदहू दुसऱ्या बारी पदार्थास आग लागूं नये किंवा तो बार होऊन उडूं नये ह्मणून तो सदहू पहिल्या बारी पदार्थापासून जरूर असेल तितका दूर ठेवलेला असल्याशिवाय, नेऊं नये.

३.—सार्वजनिक रेलवेनें न्यावयाचीं लहान कन्सैन्मेंटें, जीं कोणत्याहि वेळीं उतरण्याचा अधिकार आहे, तीं खेरीज करून, बारी पदार्थ फक्त दिवस उगवल्याच्या व दिवस मावळण्याच्या दरमियान भरलीं किंवा उतरलीं पाहिजेत. ह्या कानूच्या कारणांसाठीं अर्ध्या वागनीहून ज्यास्त कन्सैन्मेंट कोणत्याहि एकाच स्टेशनास पाठविल्यास तें लहान कन्सैन्मेंट आहे असें समजं नये.

४.—कोणत्याहि गाडीवर अगर तारवावर बारी पदार्थ भरतेवेळीं अगर त्यांतून तो उतरतेवेळीं कोणत्याहि प्रकारचा विस्तव अगर कृतीनें केलेला दिवा, अगर ज्यापासून आग किंवा बार उत्पन्न होईल किंवा पसरेल असा कोणताहि जिन्नस (जसें, कोळसा, ल्युसिफर, आगकाड्या, विस्तव पाडण्याचें सामान, पिट्रोलियम आक्ट अगर त्या आक्टास

रद्द करणारा किंवा सुधारणारा कोणताहि ॲक्ट ज्यास लागू आहे असे पिट्रोलियम, अगर फरारेनहैटच्या १००° अंशांहून कमी उष्णतामानावर पेट घेणारी वाफ ज्यापासून निघते असें कोणतेंहि स्पिरिट, तेल अगर पदार्थ) अशा गाडीच्या, जहाजाच्या अगर बोटीच्या, धोका उत्पन्न होईल इतक्या जवळ, आणतां कामा नये, अगर आणूं देतां कामा नये, किंवा बाळगतां कामा नये, अगर बाळगूं देतां कामा नये, किंवा वापरतां कामा नये, अगर वापरूं देतां कामा नये; व तींत, तीवर, अगर धोका होईल इतक्या तिच्या जवळ तंबाखू ओढूं देतां कामा नये:

मात्र इतकेंच कीं, सदहू प्रकारचा माल भरण्याच्या अगर उतरण्याच्या कारणासाठीं दिव्याचा उपयोग केल्याखेरीज चालतच नाहीं असें असेल तेव्हां, ज्या फाणसाची रचना, ठेवण्याची जागा किंवा तऱ्हा हीं अशीं असतील कीं तेणेंकरून आग अगर बार उत्पन्न होण्याची कोणत्याही प्रकारें भीती नसेल असा फाणस वापरण्यास हरकत नाहीं; आणि ( बंदुकीची दारू, ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील बारी पदार्थ, अगर ७ व्या वर्गांतील बारी पदार्थ हीं प्याक करण्याबाबदच्या कानूअन्वयें प्याक केलीं असतील तर, तीं खेरीज करून इतर ) कोणताही बारी पदार्थ हातांनीं इकडून तिकडे ठेवतेवेळीं, कोणत्याहि मनुष्यानें ज्यांस लोखंडी किंवा पोलादी चुका, टाचा, किंवा टोंकें आहेत असे बूट अगर शूस घालतां कामा नयेत.

५.—कोणताहि बारी पदार्थ भरतांना अगर उतरतांना, ज्या पिपांत व प्याकेजांत तो असेल तीं पिपें व प्याकेजें एकानें आपल्या हातांनीं उचलून दुसऱ्याच्या हातीं पोंचविलीं पाहिजेत, व तीं जमिनीवरून लोटून नेतां कामा नयेत; तीं फेकतां कामा नयेत अगर उंचावरून खालीं टाकतां कामा नयेत, परंतु तीं जपून खालीं ठेवून रचून ठेविलीं पाहिजेत.

६.—बारी पदार्थ नेणें तो, त्या बारी पदार्थांच्या बाहेरील बाजूकडून आगीच्या आघातापासून पूर्तेपणीं बचाव होईल अशा रीतीनें चोहींकडून लांकडानें अगर धातूनें मढविलेल्या गाडीच्या आंतल्या बाजूंत, किंवा सदहूप्रमाणें बचाव होईल अशा रीतीनें बंद केलेला सांधेबंद डेक ज्यास आहे अशा जहाजाच्या किंवा होडीच्या कोठींत, भरून नेला पाहिजे, नाहीं तर नेऊं नये. बारी पदार्थ वर सांगितल्याप्रमाणें बंदोबस्तानें ठेवितां येत नसेल तर, आगीच्या स्पर्शापासून त्याचा पुरतेपणीं बचाव व्हावा ह्मणून तो चोहींकडून रोगणी कापड, टर्पोलिन अगर इतर योग्य पदार्थ यांनीं आच्छादिला पाहिजे.

७.—बारी पदार्थ असलेल्या केसीचा गाडीच्या किंवा तारवाच्या ज्या भागास स्पर्श होत असेल, त्या भागाच्या आंतल्या बाजूस कोणत्याहि प्रकारचें लोखंड अगर पोलाद, तें, कातडें, लांकूड, कापड अगर इतर योग्य पदार्थांनें पुरतेपणीं मढविलेलें नसेल तर, असतां कामा नये.

८.—बारी पदार्थ रचून ठेवतांना, त्या बारी पदार्थास, अशा गाडींतून अगर तारवांतून आग अगर बार उत्पन्न करण्याजोगा जो कोणताहि इतर जिन्नस अगर पदार्थ नेला जात असेल त्याचा स्पर्श होऊं नये अगर त्यापासून अपाय होऊं नये ह्मणून तो बारी पदार्थ, मध्यें पडदा घालून किंवा इतर प्रकारें, व तो जपून रचून, सुरक्षित करण्याची योग्य सावधगिरी ठेविली पाहिजे; व जर त्या बारी पदार्थास पाणी लागलें असतां भयंकर रीतीनें अपाय होण्याजोगा तो असेल तर, त्या बारी पदार्थास पाण्याचा संसर्ग होऊं नये अशाविषयीं योग्य सावधगिरी ठेविली पाहिजे.

९.—कोणत्याहि एका गाडींतून अगर तारवांतून कोणत्याहि एका वेळीं २००० रतलांहून अधिक परिमाणाचा बारी पदार्थ नेऊं नये; मात्र, जर गाडी चोहींकडून लांकडानें अगर धातूनें अशा रीतीनें मढविलेली असेल, अगर तारवास सांधेबंद डेक असून तें अशा रीतीनें बंद केलेलें असेल, कीं त्यांतील बारी पदार्थांचा बाहेरील बाजूकडून आगीच्या आघातापासून पूरतेपणीं बचाव होईल, तर त्यांतून जो बारी पदार्थ नेणें असेल त्याचें परिमाण पुढें सांगितल्यापेक्षां अधिक असतां कामा नये:

| | |
|---|---|
| रेलवेवरील कोणत्याहि एका गाडींत ... ... .... ... ... | १० टन. |
| इतर कोणत्याहि एका गाडींत ... ... ... ... ... ... | २ ,, |
| कोणत्याहि एका तारवांत ... ... ... ... ... .... | २० ,, |

टीप.—रेलवेवरून डायनमाइट नेलें जात असेल तेव्हां त्या बाबतींत कानू ६, पारिग्राफ १२, याच्या अनुरोधानें ही कानू वाचली पाहिजे.

१०.--अपघात न होऊं देण्याबद्दल सर्व प्रकारचा योग्य सावधगिरी ठेविली असल्यास वर सांगितलेल्या ( १ ली कानू खेरीज करून इतर ) कानूंतील कोणताहि ठराव ६ व्या ( युद्धसामग्रीच्या ) वर्गाच्या १ ल्या भागांतील कोणत्याहि बरी पदार्थास लागू होणार नाहीं.

९. * * * * * * *

६. पुढील कानू सार्वजनिक रेल्वेनें बारी पदार्थ नेण्याच्या संबंधानें पाळिल्या पाहिजेतः—

१.—बारी पदार्थाचें कोणतेंहि कन्सैन्मेंट, रेलवेनें नेलें जाण्यासाठीं पाठविण्याचा आपला उद्देश आहे अशी लेखी नोटीस रेलवे स्टेशन ताब्यांत असलेल्या अमलदारास अगोदर दिल्यावांचून व तें कन्सैन्मेंट घेतलें जाईल अशी रेलवेच्या अधिकार असलेल्या अमलदाराकडून लेखी सूचना आल्यावांचून कोणत्याहि इसमानें तसें कन्सैन्मेंट सदहू कारणासाठीं पाठवूं नये; सदहू नोटिशीची मुदत रेलवे आडमिनिस्ट्रेशनाच्या मर्जीप्रमाणें ४८ तासांपर्यंत वाढवितां येईल, व तींत जो बारीपदार्थ नेण्याचा उद्देश असेल त्याचें वास्तविक नांव, वर्णन, परिमाण व तो कोणत्या प्रकारें प्याक केला आहे तें, व आपलें स्वतःचें नांव व पत्ता, आणि तसेंच ज्या कन्सैनीकडे तो बारी पदार्थ पाठविण्याचा उद्देश असेल त्याचें नांव व पत्ता हीं सदहू इसमानें दाखल केलीं पाहिजेत.

२.—विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि नोटिशीअन्वयें अगर नियमाअन्वयें जो बारी पदार्थ आपण घेणार नाहीं असें एकादें रेलवे आडमिनिस्ट्रेशन जाहीर करील तो बारी पदार्थ सदहू रेलवे आडमिनिस्ट्रेशनच्या कोणत्याहि रेलवेकडे आणतां अगर पाठवितां किंवा त्या रेलवेवरून पुढें पाठवितां कामा नये.

३.—बारी पदार्थांचीं कन्सैन्मेंटें, ज्या स्टेशनाहून तीं पाठवावयाचीं असतील त्या स्टेशनावर सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरमियानच्या ज्या वेळा रेलवे आडमिनिस्ट्रेशन नेमील त्याच मात्र वेळीं पाठविलीं पाहिजेत व रेलवेच्या नोकरांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं पाहिजेत; व कोणत्याहि रेलवेनें जो कोणताहि बारी पदार्थ नेण्याचा उद्देश असेल त्याचें प्रत्येक प्याकेज स्टेशनावर येऊन पोंहोंचल्याबरोबर लागलीच उतरून, स्टेशन ताब्यांत असलेला अमलदार विशेष रीतीनें हुकूम देईल त्याअन्वयें तें एकाद्या सुरक्षित स्थळीं ठेविलें पाहिजे.

४.—बारी पदार्थ, उतरण्याच्या स्टेशनावर येऊन पोंचल्यानंतर दिवसाच्या बारा तासांच्या आंत कन्सैनीनें तो तेथून नेला पाहिजे: ह्या शर्तीप्रमाणें सक्त रीतीनें वहिवाट करण्यांत न आल्यास सदहू कन्सैन्मेंट कन्सैनरकडे परत पाठविण्याचा अख्त्यार रेलवे आडमिनिस्ट्रेशनास आहे, व सदहू माणें परत पाठविण्याचा खर्च व जोखीम हीं कन्सैनरवर राहतील; व सदहू प्याकेजें अशा मुदतींत, ज्या वागनींतून तीं आणिलीं असतील तींत स्टेशनच्या इमारतीपासून जितकीं दूर ठेववतील तितकीं दूर ठेविलीं पाहिजेत, अगर, तीं खालीं उतरलीं असल्यास तीं रोगणी कापडानें अगर इतर योग्य पदार्थानें पूर्णपणें आच्छादिलीं पाहिजेत, व जरूर असल्यास तीं राखण्यासाठीं त्यांवर पोलीसचा पाहरा असला पाहिजे.

५.—ज्या कोणत्याहि प्याकेजांत सदरील नियमांविरुद्ध कोणताहि बारी पदार्थ प्याक केला अगर पाठविला आहे असा रेलवे आडमिनिस्ट्रेशनास संशय येईल तीं प्याकेजें घेण्याचें नाकारण्याचा त्या आडमिनिस्ट्रेशनास अख्त्यार आहे. आणि रेलवे आडमिनिस्ट्रेशनला ज्या कोणत्याहि प्याकेजाविषयीं संशय आला असेल तें प्याकेज कोणत्याहि रेलवेवर असल्यास खरी स्थिति कळण्याकरितां, कन्सैनरवर त्याबाबद जोखम व खर्च ठेऊन सदहू प्याकेज फोडण्याचा अगर फोडावयास लावण्याचा त्या आडमिनिस्ट्रेशनास अख्त्यार आहे, व कन्सैनरकडे सदहू प्याकेजांतील बारी पदार्थ त्याजवर त्याबाबद जोखम व खर्च ठेवून परत पाठविण्याचा अख्त्यार आहे, व सदहू प्याकेजें परत पाठविलीं जात तोंपर्यंत तीं सदरील कानूंत ठरविलेल्या रीतीप्रमाणें ठेविलीं पाहिजेत.

६.—रकम (इ) हींत नमूद केलेला अपवाद लागू राहून, या कानूंत यापुढें निर्दिष्ट केलेल्या प्रकारच्या बारी पदार्थांशिवाय इतर कोणताहि बारी पदार्थ, ह्या कानूंत ह्यापुढें निर्दिष्ट केलेल्या रीतीशिवाय इतर रीतीनें पासेंजर ट्रेनींतून नेऊं नयेः—

(अ) सेफ्टी काडतुसें व तोट्या व सेफ्टी फूज ( सुरुंग लावण्यासाठीं ), तसेंच, रेलवेच्या उपयोगासाठीं धुक्याच्या सिग्नली (निशाण्या); हे पदार्थ साधारण वागनींतून अगर गाड्यांतून नेण्यास हरकत नाहीं.

(ब) डायनमाइट; हा काडतुसांच्या रूपानें ९ रत्तलपर्यंत नेण्यास हरकत नाहीं; मात्र त्याच खणांतून डिटोनेटर नेऊं नयेत.

(क) डिटोनेटर; हे २०० पर्यंत नेण्यास हरकत नाहीं; मात्र इतकेंच कीं, ज्यांत सदर्हू डिटोनेटर असतील अशा एका किंवा अनेक प्याकेजांतील पाऱ्याच्या फल्मिनेटाचें प्रमाण एकंदरीनें कोणत्याहि प्रसंगीं ३ औंसांहून अधिक असूं नये (व अशाविषयीं, ज्या कंपनीनें, फर्मनें अगर इसमानें ते डिटोनेटर एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं पाठविण्याकरितां स्वाधीन केलेले असतील तिनें अगर त्यानें किंवा तिच्या अगर त्याच्या मुख्त्यारानें दाखला दिला पाहिजे); तसेंच, त्याच खणांतून डायनमाइट मुळींच नेऊं नये.

(ड) पूर्वीं ठरविल्याप्रमाणें दुहेरी केसींमध्यें प्याक केलेली अशी शिकारीच्या कामाची बंदुकीची दारू अगर नान्-सेफ्टी काडतुसें नेण्यास हरकत नाहीं; मात्र ती बंदुकीची दारू, एकरतली टिनच्या डब्यांत भरलेली असून ते डबे, आंत ठिणगी मुळींच शिरणार नाहीं अशा रीतीनें बाहेरून कथलानें अगर जस्तानें मढविलेल्या मजबूत लांकडी केसींत, अगर रेलवे आडमिनिस्ट्रेशनानें पसंत केलेल्या नमुन्याच्या धातूनें मढविलेल्या केसींत प्याक केली असली पाहिजे. परंतु बाहेरील कोणत्याहि केसींत २९ रतलांहून जास्त बंदुकीची दारू असूं नये, व एका ट्रेनींत बंदुकीच्या दारूचें अगर नान्सेफ्टी काडतुसांचें एकंदर कन्सैन्मेंट ८० रतलांहून जास्त असूं नये.

(इ) ज्या कोणत्याहि लैनीवर गुड्स ट्रेनी चालत नसतील त्या लैनीवर पुढील शर्तींस अनुसरून मिक्स्ड ट्रेनींतून बारीपदार्थ नेण्याचा अधिकार आहे ह्मणजे, एका मिक्स्ड ट्रेनीबरोबर, बारीपदार्थ भरलेल्या एकाहून जास्त गाड्या एकेच वेळीं पाठवूं नये; गुड्स ट्रेनींतून बारी पदार्थ नेण्याच्या संबंधानें ठरविलेले पूर्वोपाय केले पाहिजेत; आणि लैनीच्या ज्या भागावर गुड्स ट्रेनी चालत असतील त्या भागावर बारीपदार्थांची वागन येतांच ती मिक्स्ड ट्रेनीपासून वेगळी काढिली पाहिजे.

७.—कोणत्याहि रेलवे स्टेशनावर कोणत्याहि एका वेळीं बारी पदार्थांच्या पांचांहून अधिक गाड्यांत बारी पदार्थ भरूं नयेत किंवा पांचांहून अधिक गाड्यांतीून बारी पदार्थ उतरूं नयेत, अगर कोणत्याहि एका ट्रेनीबरोबर बारी पदार्थ भरलेल्या पांचांहून अधिक गाड्या कोणत्याहि एका वेळीं नेऊं नयेत; व कोणत्याहि एका गाडींत जो बारी पदार्थ भरावयाचा त्याचें मान, ती गाडी बारी पदार्थ नेण्यासाठींच मुद्दाम तयार केलेली नसेल तर व ती हिंदुस्थान सरकारानें पसंत केलेली नसेल तर, नेहमींच्या ओझ्याच्या दोन-तृतीयांशाहून अधिक असूं नये. परंतु लहानसान हत्यारांच्या युद्धसामग्रीच्या निरनिराळ्या कन्सैन्मेंटांस ह्या रकमेंतील कोणताहि ठराव लागू आहे असें समजूं नये.

८.—कोणत्याहि लुसिफर अगर इतर आगकाड्या, फ्यूजी, पेपलेट्स, आसिडें, नाप्था, पाराफिन, ज्यास पेट्रोलियम आक्ट अगर त्या आक्टास रद्द करणारा अगर सुधारणारा कोणताहि आक्ट लागू असेल असें पेट्रोलियम, अगर ज्यांतून पेट घेणारी वाफ निघण्यासारखी असेल किंवा जें आपोआप पेट घेण्यासारखें असेल किंवा ज्याच्यापासून अग्नि अगर बार उत्पन्न होईल अगर पसरेल असें वाफ होऊन उडून जाणारें कोणतेंहि इतर स्पिरिट अगर पदार्थ, कोणत्याहि बारी पदार्थाबरोबर एकाच गाडींतून नेतां कामा नये.

९.—सदर्हू बारी पदार्थ गनुकाटन, डायनमाइट अगर सुरंगाच्या कामाचें जिलेटीन असल्यास, तो ठरविलेल्या ध्ययत्तेप्रमाणें शुद्ध आहे व तो तयार केल्यापासून कोणत्याहि प्रकारें बिघडलेला नाहीं असा आणि याशिवाय, डायनमाइटच्या बाबतींत काडतुसें तपासून पाहिलीं आहेत, आणि त्यांतून नैट्रोग्लिसरिन पाझरल्याचें कांहींएक चिन्ह दिसत नाहीं असा स्थानिक सरकारानें ह्याबाबद अधिकार दिलेल्या अमलदाराच्या सहीचा दाखला कन्सैनरनें कन्सैन्मेंटच्या चिठ्ठीस जोडला पाहिजे. तसेंच, सदर्हू काडतुसें, प्याक करण्याबाबदच्या कानूंवरहुकूम या देशांत प्याक केलेलीं आहेत असाही कन्सैनरनें दाखला दिला पाहिजे.

१०.—डायनमाइटच्या बाबतींत, ज्या तारखेस डायनमाइट प्याक केलें असेल ती तारीख बाहेरील प्याकेजावर लिहिली पाहिजे, व तें प्याकेज, पाहणी झाल्याच्या खुणेसाठीं ह्मणून त्यावर शिशाचा शिक्का मारून, सुरक्षित केलें पाहिजे.

११.—तपासणी १५ वी आक्टोबर व ३१ वी मार्च यांच्या दरमियान झाली असल्यास, ९ व्या कानूंत सांगितलेला दाखला, त्याजवरील तारखेपासून सहा महिनेपर्यंत व्यवहारोपयोगी होईल; परंतु एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं नेण्यासाठीं डायनमाइट घेणाऱ्या कोणत्याहि रेलवे आडमिनिस्ट्रेशनास, १ ली एप्रिल व १५ वी आक्टोबर (दोन्ही धरून) यांच्या दरमियान डायनमाइट, नेण्यासाठीं, दिलें असल्यास त्याबद्दल नवीन दाखला मागण्याचा अख्त्यार आहे.

१२.— डायनमाइटचीं प्याकेजें फक्त एकच थर लावून रचलीं पाहिजेत व तीं, नेलीं जात असतांना, हालणार नाहींत अशा रीतीनें सुरक्षित ठेविलीं पाहिजेत. कोणत्याहि एका वागनींतील ओझ्याचें ठोकमान ३ टनांहून जास्त असूं नये.

१३.—९ व्या (फल्मिनेटच्या) वर्गांतील अगर ६ व्या वर्गाच्या १ ल्या भागांतील कोणताहि बारी पदार्थ, डायनमाइट बरोबर अगर ३ ऱ्या वर्गाच्या १ ल्या भागांतील इतर कोणत्याहि बारी पदार्थांबरोबर एकाच ट्रेनींतून नेतां कामा नये.

१४.—बारी पदार्थ नेण्याच्या कामाच्या वागनी त्यांत ठिणगीचा प्रवेश होण्यासारखा नाहीं असें व त्या भरण्यापूर्वी साफ केल्या आहेत असें पाहण्यासाठीं, तपासल्या पाहिजेत. प्याकेजांना वरून गोणपाट अगर बुरणूस गुंडाळलें असेल तेव्हां अगर त्यांमध्यें कथलानें मढविलेल्या सर्व्हिस-प्याटर्न पेट्यांत प्याक केलेलो लहानसान हत्यारांची युद्धसामग्री भरली असेल तेव्हां खेरीज करून इतर प्रसंगीं, वागनीच्या तक्तपोशीवर व प्याकेजांच्या प्रत्येक थराच्या दरमियान हेअरक्लॉथ, कातडीं, अगर इतर योग्य पदार्थ पसरला पाहिजे.

१५.—बारी पदार्थांच्या वागनी भरणें व खालीं करणें त्या, स्टेशनच्या इमारतींपासून शक्य असेल तेवढ्या दूरच्या सायडिंगांत भरल्या व खालीं केल्या पाहिजेत.

१६.—कथलानें मढविलेल्या सर्व्हिस-प्याटर्न पेट्यांत प्याक केलीं ह्मणजे जिच्या संबंधानें पुढें दिलेल्या निर्बंधाची जरूरी नाहीं अशा लहानसान हत्यारांच्या युद्धसामग्रीच्या बाबतींत खेरीज करून, बारी पदार्थांच्या प्याकेजांचे एकावर एक असे तिहींपेक्षां अधिक थर कधींहि रचूं नयेत. कानू ४(३) यांतील ठरावांस अनुसरून, बारी पदार्थ भरण्याचें व उतरण्याचें काम एकदा सुरू केलें ह्मणजे तें सगळें संपे तोंपर्यंत दक्षतेनें चालविलें पाहिजे.

१७.—जेव्हां डबे जोडून ट्रेन तयार करण्यांत येत असेल तेव्हां, बारी पदार्थांनीं भरलेल्या वागनी लोकोमोटिव्हनें शंट करण्यास हरकत नाहीं : मात्र इतकेंच कीं सदर्हू वागनी व एंजिन यांच्या दरमियान, ज्यांत कोणताहि बारी पदार्थ अगर सहज पेट घेणारा पदार्थ नाहीं अशा निदान तीन वागनी असाव्या; ही सावधगिरी बारी पदार्थ नेण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या वागनींच्या संबंधानें ठेवण्याची जरूरी नाहीं. सदर्हू [शंटिंगच्या] गतीच्या वेगाची मर्यादा दर तासास ५ मैल असावी, व योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या अमलदारानें त्यांवर देखरेख ठेवावी, व त्यास हे हुकुम पाळले जाण्याबाबद जबाबदार धरलें जाईल. फ्लाइंग (वेगानें) शंट करण्याची सक्त मनाई आहे.

१८.— बारी पदार्थांच्या वागनी ट्रेनीच्या शेवटीं लोकोमोटिव्हपासून लांब ठेवल्या पाहिजेत, व त्या एकमेकींशीं व तसेंच जवळच्या वागनींशीं अगदीं लावून जोडल्या पाहिजेत, व त्यांच्या पुढें व मागें ज्यांत बारी पदार्थ अगर पेट घेणाऱ्या प्रकारचा इतर माल भरलेला नाहीं अशा तीन तीन वागनी असल्या पाहिजेत.

१९.— बारी पदार्थ एका स्थळाहून दुसऱ्या स्थळीं पाठविण्याच्या कामीं लावलेल्या वागनींस ब्रेकं असतील तर त्यांवरील ब्रेकांचा, सदर्हू वागनी एकाद्या ट्रेनीबरोबर चालत असतांना कोणत्याहि कारणामुळें उपयोग करूं नये, व तसेंच सदर्हू वागनी वर सांगितल्याप्रमाणें चालत असतांना त्यांच्या अगदीं लगतच्या गाड्यांवरील लोखंडी ब्रेकांखेरीज इतर ब्रेकांचा उपयोग करूं नये.

२०.— वागनींत बारी पदार्थ भरले ह्मणजे, प्रत्येक बाबतींत, त्या वागनी कुलुपें लावून बंद केल्याच पाहिजेत.

२१.—जंक्शन स्टेशनांवर बारी पदार्थ एका रेल्वेवरून दुसऱ्या रेल्वेवर चढविण्याबाबदचीं सर्व कामें दिवसा उजेडीं झालीं पाहिजेत.

७. बारी पदार्थ नेण्याच्या रीतीच्या संबंधाच्या सदरीं सांगितलेल्या कानूंपैकीं कोणतीहि कानू कोणत्याहि मनुष्यानें मोडल्यास, त्यास १००० रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.